**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९९ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. मधुकर संपत गेजगे<br>१४३/६, न्यू लक्ष्मी चाळ,<br>देगाव रोड, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक)<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |

मार्च १९८० ते मार्च २००६ पर्यंत किती शाळांची मान्यता काढून घेण्यात आली, त्या शाळा कोणत्या, कोणत्या नियमान्वये मान्यता काढून घेण्यात आली, मान्यता काढून घेण्यासाठी कोणते निकष लावले जातात, मान्यता काढून घेण्यासंबंधी आपल्या वरिष्ठ कार्यालयाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या सही-शिक्क्याच्या नकला आदि माहिती अपीलकर्ता श्री. मधुकर संपत गेजगे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. वरील माहिती दि. १८.६.२००८ रोजी समक्ष दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 .७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुंवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दादासाहेब ऊर्फ भाऊसाहेब पायगोंडा पाटील
मु.कोठाळी, पो.होले, ता.पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३ / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दादासाहेब ऊर्फ भाऊसाहेब पायगोंडा पाटील
मु.कोठाळी, पो.होले, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.बी.एस.पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.८.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कोठाळी, ता.पंढरपूर येथील जमीन गट नं.४१८/१ क्षेत्र २.८४ या जमिनीबाबत फेरफार क्र.८२८ चे अंतिम निर्गती कामी हा अर्ज मंजूर करावा व सदर नोंदीत पायगोंडा भाऊ पाटील मयत वारस मुलगा दादासाहेब ऊर्फ भाऊसाहेब पायगोंडा पाटील, मुलगी सरिता शितल पाटील अशी दुरुस्ती नोंद करुन योग्य ती निर्गती व्हावी. |

## विवेचन

जमिनीच्या हक्कपत्रकावरील नावाची नोंद अपूर्ण असून ती पूर्ण करण्याविषयीची-नोंद दुरुस्त करण्याविशयीची मागणी अपीलकर्ता श्री.दादासाहेब ऊर्फ भाऊसाहेब पायगोंडा पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पंढरपूर यांच्याकडे केली होती. फेरफाराच्या संदर्भातील ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नसल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांनी अर्ज निकाली काढला. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पंढरपूर यांच्याकडे श्री.पाटील यांनी केलेले अपील नोंद अपूर्ण नसल्याचे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी यांनी निकाली काढले व संबंधित नोंदीची छायांकित प्रत श्री.पाटील यांना पुरविली. परंतु आपल्याला मिळालेले उतारे नोंद मंजूर नसलेले असून बदलाची हक्कपत्रके व कागदपत्रांची चौकशीने तपासणी व्हावी, अशी मागणी श्री.पाटील यांनी आयोगाकडील अपिलात केली आहे. ही मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि३१.७.२००८

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.खंडेराव मारुती वाघमोडे
१२१, बुधवार पेठ, मिलिंदनगर, सोलापूर — अपीलकर्ता

विरुद्ध

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सिव्हील हॉस्पिटलमागे, सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१४ + ४०५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.१.२००८ |

३. उपस्थित

अपीलकर्ता श्री. खंडेराव मारुती वाघमोडे
१२१, बुधवार पेठ, मिलिंदनगर, सोलापूर

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सिव्हील हॉस्पिटलमागे, सोलापूर श्री.ए.एम.अंबाळकर

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर श्री.का.भा.धावारे

| अ. क्र | अपील क्र. | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | २१४ | दि. [illegible].१२.२००५ | दि. -- | दि. २८.४.२००६ | दि. २१.७.२००६ |
| २ | ४०५ | दि. [illegible].१२.२००६ | दि. -- | दि. १४.२.२००७ | दि. २१.३.२००७ |

८ ...के अर्जात मागणी ... माहिती

अनधिकृत बुध्दविहार व व्यायामशाळा ही वास्तू ज्या जागेवर सध्या उभी आहे, त्यासाठी लोकांकडून देणग्या गोळा केलेल्या आहेत व त्याचा हिशोब कुठेही नाही. तसेच बुध्दविहार व व्यायामशाळा बांधण्याबाबत आवश्यक असणाऱ्या कायदेशीर बाबी कोणत्याही नाहीत, म्हणजेच सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांची परवानगी घेतलेली नाही. बुध्दघोष युवक क्रीडा मंडळ हे नोंदणीकृत मंडळ नाही, अशी वस्तुस्थिती असताना आपण श्री. निजाप्पा महादेव इंगळे यांना त्यांच्या या तक्रारीशी संबंध नाही, किंवा दिसून येत नाही हे कोणत्या आधारावर पत्र दिले. अशा प्रकारचे पत्र मिळावे, अशी श्री.इंगळे यांनी आपल्याकडे लेखी मागणी केली आहे काय, त्याची प्रत. चौकशी निरीक्षक अहवाल १२/२००५ हे सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांच्या निदर्शनास आणला आहे काय, सदर चौकशी अहवालावर सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी कृती कार्यवाहीचा आदेश केला आहे काय, बुध्दघोष क्रीडा मंडळ पावतीपुस्तक छापून लोकांकडून वर्गणी घेत आहेत, त्याबाबत आपण कोणती कायदेशीर कारवाई करणार आहात, याची माहिती

## विवेचन

श्री. निजाप्पा महादेव इंगळे यांना बुध्दविहार व व्यायामशाळा यांच्या बांधकामाबाबतच्या तक्रारीशी संबंधित नसल्याचे पत्र अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी कशाच्या आधारे दिले, तसेच अनधिकृत बुध्दविहार व व्यायामशाळा चौकशीची मागणी करणाऱ्या अर्जावर निरीक्षकांनी सादर केलेल्या चौकशी अहवालावर सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे आदेश झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी दि. १८.५.२००५ रोजी कळविले होते, याबाबत कोणती कार्यवाही झाली, याची माहिती अपीलकर्ता श्री. खंडेराव मारुती वाघमोडे यांनी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याकडे दि. ७.१२.२००५ व दि. १५.१२.२००६ अशा दोन अर्जाद्वारे केली होती. जन माहिती अधिकारी यांनी याबाबत दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे श्री. वाघमोडे यांनी अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर

यांच्याकडे अपील केले. श्री. इंगळे यांनी दिलेल्या पत्राच्या संदर्भात माहितीच्या मागणीपेक्षा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांच्यावर आरोप व त्या स्वरूपाचे भाष्य अधिक आहे, असे नमूद करून अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर श्री. ए. एम. अंबाळकर यांनी अपील फेटाळले. चौकशी अहवालावरील कार्यवाहीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी माहिती दिली नाही, म्हणून श्री. वाघमोडे यांनी केलेले अपील अपिलीय प्राधिकारी श्री. ए. एम. अंबाळकर यांनी मान्य केले व सात दिवसांच्या आत माहिती निःशुल्क पुरविण्याचे आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दिले. परंतु त्यांनी ती माहिती दिली नाही, म्हणून श्री. वाघमोडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे (अपील क्र. २१४ व ४०५/ सोल...) अपिले केली आहेत.

श्री. वाघमोडे व श्री. इंगळे यांच्यामध्ये पिठाच्या गिरणीचा परवाना, वीज जोड या अनुषंगाने गेल्या काही वर्षांपासून वाद आहे. त्या संदर्भात श्री. वाघमोडे व श्री. इंगळे विविध बाजू, विविध पातळ्यांवर अर्ज तक्रारी करीत आले आहेत. राज्य माहिती आयोगाकडे उभय बाजूंनी अपिले दाखल केली आहेत.

अपील क्र. २१४ बुध्दविहार व व्यायामशाळा यांच्या बांधकामासंबंधी आहे. 'श्री. निजाप्पा महादेव इंगळे व त्यांच्या तीन मुलांनी बुध्दघोष युवक क्रीडा मंडळ, संचालक बुध्दविहार व व्यायामशाळा यांच्या नावाने पावती पुस्तके छापून लोकांकडून मोठ्या प्रमाणात वर्गणी गोळा करून पैशांचा अपहार केला आहे. बुध्दविहार व व्यायामशाळेचे त्यांनी केलेले पक्के बांधकाम अनधिकृत आहे,' असे श्री. वाघमोडे यांचे म्हणणे आहे. परंतु बुध्दघोष युवक क्रीडा मंडळ, सोलापूर ही सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात नोंदणी झाली असल्याचे सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर श्री. का. भा. धावारे यांनी श्री. वाघमोडे यांना कळविले. ही माहिती चुकीची व बेकायदेशीर कार्यवाही केल्याची आहे, असे श्री. वाघमोडे यांनी पत्रव्यवहारात नमूद केले आहे. संबंधित बांधकामाला महानगरपालिकेने परवानगी दिलेली नाही व जागा महानगरपालिकेच्या मालकीची असून ती कोणाच्याही नावे हस्तांतरित केलेली नाही, असे जन माहिती अधिकारी, सोलापूर महानगरपालिका यांनी श्री. वाघमोडे यांना अन्य अर्जावर कळविले आहे. परंतु श्री. वाघमोडे यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे, त्यांचे

आरोप, त्याबाबतची चौकशी, बांधकामाचा कायदेशीर /बेकायदेशीरपणा हा स्वतंत्र विषय आहे. श्री. वाघमोडे यांचा मूळ अर्ज व अपिलातील निवेदने यातही प्रामुख्याने माहितीपेक्षा कारवाईची मागणी आहे. अशी मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

अपील क्र. ४०५ बाबत मात्र चौकशी आदेशावरील कार्यवाहीबाबतची कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर श्री. का. भा. धावारे यांनी दिलेली नाही, ती देणे आवश्यक होते. माहिती देणे शक्य होते, मागितलेली माहिती कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर श्री. ए.एम. अंबाळकर यांनी आपल्या आदेशात स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यांनी सात दिवसांत माहिती निःशुल्क पुरविण्याचे आदेश दि. २१.३.२००७ रोजी देऊनही अद्याप आपल्याला माहिती मिळाली नाही, असे श्री. वाघमोडे यांनी दि. १७.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील निवेदनात नमूद केले आहे. याचा अर्थ जवळ जवळ दीड वर्ष होऊनही कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर श्री. का. भा. धावारे यांनी दिलेली नाही, त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

एक आठवड्यात माहिती द्यावी असा आदेश आयोगाने दि.३०.१.२००८ रोजी सुनावणीच्या वेळीच दिला होता. परंतु त्याबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी अथवा अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ३०.७.२००८ पर्यंत आयोगाला सादर केलेला नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**<u>आदेश</u>**

१. अपील क्र. २१४ अमान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्र. ४०५ मान्य.

३. अपील क्र. ४०५ मध्ये माहिती वेळेत न दिल्याबाबत जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर श्री. का. भा. धावारे यांना रू. २५,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम ही पाच समान हप्त्यामध्ये पुढील तीन महिन्यांत वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, १८ माहितीचा

अधिकार ००७००१६१' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी करावी. तसेच त्याबाबतची नोंद त्यांचे सेवापुस्तक व गोपनीय अहवालात घ्यावी. त्याबाबतचा अनुपालन अहवाल अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाला सादर करावा.

४. देय माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क दिल्याबाबतचा पूर्तता केल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. ३१ .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी<br>मु.पो. कुर्डूवाडी, श्री दत्त रोड,<br>ता. माढा, जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | जिल्हा पुरवठा अधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | हजर |

सोलापूर जिल्ह्यातील घाऊक व अर्धघाऊक रॉकेल विक्रेते ज्यांच्याकडे ज्वालाग्रही पदार्थ साठवण्याचे परवाने नाहीत, त्यांच्यावर केलेली कारवाई, नोटिस, खुलासे, जाबजबाब, शासकीय परिपत्रके इ. कागदपत्रे अपीलकर्ता श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. माहिती मुदतीत घेऊन जाण्यास कळवूनही श्री. भलाणी माहिती घेण्यास आले नाहीत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले. अपीलकर्ता श्री. भलाणी माहिती मागतात, शुल्क कळविल्यानंतर भरत नाहीत व अपिलाच्या सुनावणीला उपस्थित राहत नाहीत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. उपलब्ध कागदपत्रे पाहता श्री. भलाणी यांनी संपर्क साधल्याचे दिसून येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 29 .७.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२७ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुरेश भीमाशंकर बेरूणगी<br>२२३, शिवगंगानगर भाग २, गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कर संकलन प्रमुख व करसंकलन अधिकारी<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त (स),<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. सुरेश भीमाशंकर बेरूणगी यांनी सोलापूर शहर पाणी बिलाच्या आकारणीबाबत ७ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा सर संकलन प्रमुख व करसंकलन अधिकारी यांच्याकडे मागितली होती. मागणी केलेली माहिती समाधानकारक मिळाली असल्याचे अपीलकर्त्याने वरील घटकांमधील चर्चेत लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. जयंत हरी जोशी<br>रा. ३, गंगा विहार को.ऑप. हौसिंग सोसायटी,<br>पिंगळेवस्ती, मुंढवा रोड, पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक पोलीस आयुक्त,<br>वानवडी विभाग, पुणे शहर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४,<br>पुणे शहर | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. जयंत हरी जोशी यांनी गंगा विहार को. ऑप. हौसिंग सोसायटी, पिंगळेवस्ती, मुंढवा रोड, पुणे या संस्थेबाबत दि. १२.१२.२००५ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती.

सदर दोन्ही घटकांतील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती पंधरा दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास माहिती दिल्याबाबतचा अहवाल आयोगास दि. २५.७.२००८ पर्यंत सादर करावा.

पुणे
दि. 29.७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप मल्हारराव पाटील
४०८, मंगळवार पेठ, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, आरोग्य सेवा,
कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१/ सातारा /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.दिलीप मल्हारराव पाटील
४०८, मंगळवार पेठ, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, आरोग्य सेवा,
कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.११.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.११.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सेवाविषयक बाबींची मागणी. | |

## विवेचन

वैद्यकीय अधिकारी पदावर आठ वर्षे सेवा केल्यानंतर आपल्याला कारणे न देता दि.२१.१.१९८५ रोजी काढून टाकून केलेल्या सेवासमाप्तीच्या संदर्भात विविध कागदपत्रांची मागणी डॉ.दिलीप मल्हारराव पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले नाही व अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांनी यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून डॉ.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले होते. आयोगाकडे दाखल झालेल्या अपिलासंदर्भात अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना सद्यस्थितीबाबत विचारणा करणारे पत्र आयोगाने दि.७.११.२००७ रोजी पाठविले होते. त्यानंतर अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ यांनी दि.२०.११.२००७ रोजी त्यांच्याकडील अपिलाची सुनावणी घेतली. उपसंचालक कार्यालयाकडे सध्या उपलब्ध असलेली माहिती आपल्याला प्राप्त झाली, असे डॉ.पाटील यांनी लेखी दिल्याचे त्यांच्या सहीचे पत्र आयोगाला सादर करण्यात आल्यानंतर आयोगाने अपील निकाली काढले. परंतु 'आपल्याला कोणतीही माहिती मिळाली नसून फसवणूक करुन उपसंचालक कार्यालयाने आपली स्वाक्षरी घेऊन माहिती दिल्याचे आयोगाला खोटे कळविले आहे. म्हणून निर्णयाचे पुनर्विलोकन करावे,' असा विनंती अर्ज डॉ.पाटील यांनी दि.१.१.२००८ रोजी आयोगाकडे केला. त्यांची विनंती मान्य करुन आयोगाने त्यांच्या अपिलाचा फेरविचार केला.

डॉ.पाटील यांना १९८५ साली वैद्यकीय सेवेतून मुक्त करण्यात आले. कारणे दाखवा नोटीस, दोषारोपपत्र, चौकशी अहवाल यातील आपल्याला काहीही मिळाले नाही, असे डॉ.पाटील

यांचे म्हणणे आहे. त्या अनुषंगाने आरोग्य, उपसंचालक कार्यालयासह विविध संबंधित कार्यालये यांच्याकडे डॉ.पाटील हा विषय गेली काही वर्षे मांडत आले आहेत. संबंधित कागदपत्रे उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर या कार्यालयाकडे उपलब्ध नाहीत, कारण दि.१.४.१९९२ रोजी सातारा जिल्हा आरोग्य सेवेच्या पुणे विभागीय मंडळाकडे वर्ग करण्यात आला व सर्व नस्ती दि.१९.११.१९९२ रोजी त्यांच्याकडे पाठविण्यात आल्या. त्यामुळे आस्थापनाविषयक माहिती त्यांच्याकडून घ्यावी, असे आपल्या कार्यालयाने डॉ.पाटील यांना कळविले होते, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विविध कागदपत्रांसह नमूद केले. तसेच आता कोल्हापूर व सातारा मंडळाचे विलिनीकरण वगैरे प्रक्रिया पार पडून दि.१.२.२००८ रोजी कोल्हापूर मंडळ रद्द होऊन सांगली व कोल्हापूर हे जिल्हा पुणे मंडळाला जोडले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. गैरहजेरी, रजा वगैरे कारणांबाबत डॉ.पाटील यांना पत्र देऊन व स्पष्टीकरणाची सर्व संधी देऊन सेवामुक्त करण्यात आले आहे, असे त्यांनी विस्ताराने नमूद केले. डॉ.पाटील यांनी या संदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे केलेला दावा दि.१०.१२.१९९६ रोजी न्यायाधिकरणाने फेटाळून लावला आहे, असेही त्यांनी नमूद केले. राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांनीही त्यांचे या संदर्भातील एक अपील दि.१३.१.२२००७ रोजी फेटाळले आहे.

आपल्यावर अन्याय झाला आहे व कोणतीही कागदपत्रे न देता आपल्याला सेवामुक्त करण्यात आले आहे, ही डॉ.पाटील यांची मुख्य तक्रार आहे. त्या संदर्भातील कागदपत्रांची मागणी ते करीत आहेत.

दि.२०.११.२००७ रोजी आपल्याला उपलब्ध माहिती प्राप्त झाल्याचे व अन्य माहिती संदर्भात कार्यालयाकडे माहिती नसल्याचे डॉ.पाटील यांना लेखी दिले होते. 'लबाडीने व फसवणूक करुन आधीच तयार केलेल्या पत्रावर आपली स्वाक्षरी घेतली आहे,' हे त्यांचे म्हणणे मान्य होण्यासारखे नाही. डॉ.पाटील हे सुशिक्षित असून आपल्यावर अन्याय झाल्याच्या तक्रारीबद्दल विविध पातळ्यांवर संघर्ष करीत आहेत. या स्थितीत तयार असलेल्या पत्रावर आपण स्वाक्षरी केली, हे त्यांचे म्हणणे स्वीकारता येणार नाही. तरीही पुणे मंडळाकडील व डॉ.पाटील यांच्या मूळ

प्रकरणाच्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती दि.२०.२.२००८ पर्यंत उपलब्ध करुन द्याव्यात असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ कोल्हापूर श्री.एस.एच.बागल यांनी उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांना दि.२२.१.२००८ रोजी याची कल्पना देऊन माहिती देण्यास सुचविणारे पत्र पाठविले. त्यानंतर दि.११.२.२००८ रोजी पुन्हा स्मरणपत्र पाठवून आवश्यक तर आपले संबंधित अधिकारी व पुणे मंडळातील अधिकाऱ्यांसमवेत उपस्थित राहतील, असे श्री.बागल यांनी त्यांना कळविले. दरम्यान उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे मंडळ यांनी संबंधित कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी आणखी १५ दिवसांची मुदत मिळण्याची विनंती आयोगाला केली. आयोगाने ती मान्य केली. ही वाढीव मुदत दि.४.३.२००८ रोजी संपत असल्याचेही उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ डॉ.बी.आर.चव्हाण यांनी पुणे मंडळाला कळविले. संबंधित नस्ती प्राप्त झाली असून अवलोकनासाठी व आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती घेण्यासाठी उपलब्ध करुन देता येतील, असे उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ यांनी डॉ.पाटील यांना व आयोगाला दि.४.३.२००८ रोजी कळविले. त्यानुसार डॉ.पाटील यांनी दि.५.३.२००८ रोजी कागदपत्रांची पाहणी केली. त्यावेळी उपसंचालक, कोल्हापूर कार्यालयाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री.एस.एच.बागल हे उपसंचालक, पुणे कार्यालयाचे जन माहिती अधिकारी श्री.कांडेकर यांच दालनात उपस्थित होते. परंतु आपल्याला आवश्यक असलेली माहिती या नस्तीमध्ये नसल्याचे डॉ.पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना; तसेच आयोगालाही कळविले. 'सदर नस्ती ही संपूर्णतः न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगानेच सर्व कागदपत्रे होती. त्या नस्तीमध्ये एकूण १९३ पृष्ठ फक्त होते. परंतु या कार्यालयाचे पत्र क्र.२ब/न्याय/प्र.मॅट/डॉ.डी.एम.पाटील/५०१४-१७/९४, दि.११.३.१९९४ अन्वये मा.उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांना सर्व नस्ती पृष्ठ क्र.१ ते ७१, १ ते ३०३ आणि १ ते ३९१ त्यांच्या कार्यालयात हस्तांतरित केलेल्या होत्या. याबाबतची कल्पना जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री.कांडेकर यांना देऊन आपण त्याचा शोध घ्यावा, अशीही विनंती करण्यात आली,' असे जन माहिती अधिकारी तथा मुख्य

प्रशासकिय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर श्री.एस.एच.बागल यांनी आयोगाला सादर केलेल्या त्यांच्या दि.१४.३.२००८ च्या निवेदनात नमूद केले आहे.

'संबंधित विषय २२ वर्षांपूर्वीचा असून १६ वर्षांपूर्वीची नस्ती शोधण्यासाठी स्वतंत्र पथक नेमून प्रयत्न केले. एक नस्ती सापडली परंतु डॉ.पाटील यांना हवी असलेली माहिती त्यात आढळली नाही. डॉ.पाटील यांची सेवा शासनाचे शासन पत्र क्रमांक/एमएचएस.११८४/ ६४४५/एसइआर-३, दि.२१.१.१९८५ अन्वये एक महिन्याची नोटीस देऊन समाप्त केलेली आहे. त्यामुळे डॉ.पाटील यांनी मागणी केलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध होऊच शकत नाही. तसेच वरील शासन पत्र सोबत जोडून लक्ष वेधण्यात येते की, डॉ.पाटील यांना एक महिन्याची नोटीस देऊन सेवा समाप्त केलेली आहे. त्यामुळे उपरोक्त मागणी केलेली कागदपत्र तयार झालेली नसावीत अशी या कार्यालयाची धारणा आहे. तसेच जे कागदपत्र प्रतयक्षात तयार झालेलीच नाहीत तीच कागदपत्रे डॉ.पाटील हे वारंवार मागणी करीत आहेत,' असे उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे-१ यांनी आयोगाला दि.१७.३.२००८ रोजी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

डॉ.पाटील यांच्या कागदपत्रांबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर कार्यालयातील जन माहिती अधिकारी श्री.एस.एच.बागल व उपसंचालक डॉ.बी.आर.चव्हाण यानी सातत्याने पाठपुरावा केला आहे, हे प्रशंसनीय आहे, मात्र पुणे मंडळाने डॉ.पाटील यांच्याशी संबंधित नस्तीबाबत तत्परतेने कार्यवाही केलेली नाही. कोल्हापूर मंडळाने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणापुढील दाव्याच्या अनुषंगाने दि.११.३.१९९४ अन्वये पुणे मंडळाकडे हस्तांतरित केलेल्या नस्ती पृष्ठ क्र.१ ते १७१, १ ते ३०३ आणि १ ते ३९१ यांचा शोध पुणे मंडळाचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अधिक सखोलपणे घेणे व डॉ.पाटील यांना त्या नस्ती पाहण्यासाठी उपलब्ध करुन देऊन आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती पुरविणे आवश्यक आहे. उपसंचालक, पुणे मंडळ यांच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे 'अशी कागदपत्रे तयारच झाली नसावीत' हा अंदाज आहे. उपरोक्त नस्तीमध्ये शोध घेऊन त्याबाबत खात्री केली जाणे आवश्यक आहे.

डॉ.पाटील यांच्यावर अन्याय झाला की नाही, हा राज्य माहिती आयोगापुढील चर्चेचा विषय नाही. तसेच त्याबाबत त्यांना कशी कशी संधी देण्यात आली, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विसताराने नमूद केले, त्यावर आयोगाने भाष्य करणे आवश्यक नाही. संबंधित कागदपत्रे तयार झाली असल्यास ती त्यांना मिळणे हा त्यांचा हक्क आहे. मात्र आपल्याला अपेक्षित असलेली व कारवाईच्या दृष्टीने तयार व्हावयास हवी होती अशी आपल्याला वाटणारी कागदपत्रे मागण्याचा प्रयत्न (उदा.चौकशी अहवाल) डॉ.पाटील करीत आहेत, असे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरुन दिसते. सातत्याने अशा प्रकारची मागणी करणे हे सर्व यंत्रणांचा वेळ अकारण वाया घालविणे आहे, याची समज डॉ.पाटील यांना देण्यात येत आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) पुनर्विलोकन अंशतः मान्य.

(२) मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांनी पत्र क्र.२ब/न्याय/प्र.मॅट/डॉ.डी.एम.पाटील/५०१४-७/९४, दि.११.३.१९९४ अन्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांना पाठविलेल्या नस्ती पृष्ठ क्र.१ ते ७१, १ ते ३०३ आणि १ ते ३९१ या नस्तीचा शोध घेऊन जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ व अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांनी शोध घेऊन दि.२५.८.२००८ पर्यंत अपीलकर्त्याला निःशुल्क माहिती द्यावी व त्याबाबतचा अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२८.७.२००८
२१.१.२००८/सातारा/४-६

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. संजय भगवान बनसोडे<br>कार्याध्यक्ष, भा.रि.पा. बहुजन महासंघ, बारामती,<br>पो. पिंपळी, ता. बारामती, जि. पुणे. | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग,<br>ता. बारामती, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हाधिकारी, पुणे | हजर |

तलाठ्याने बनविलेल्या कब्जा नकाशा संदर्भात कोणते सबळ पुरावे तलाठी यांनी विचारात घेतले होते, याविषयी माहिती अपीलकर्त्याने मागितली होती. यासंदर्भात श्री. सुरेश सादू खोमणे व इतर, रा. माळेगाव खुर्द यांना जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, बारामती यांनी दि.२५.६.२००७ रोजी दिलेल्या उत्तरासंबंधी वरीलप्रमाणे माहिती अपीलकर्त्याने मागविल्याचे दिसून येते. बनावट नकाशे तयार केल्याने तलाठ्याविरूध्द कारवाई व्हावी, मालमत्तापत्रकी खाडाखोड कधी व कशी झाली याच्या माहितीबरोबरच नोंद दुरूस्त व्हावी इत्यादी मागण्या अपीलकर्त्याने केल्या आहेत.

अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्याची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नसल्याने प्रथम अपील निकाली काढले आहे. संबंधित कागदपत्रांचे अवलोकन केले असता अधिकार अभिलेखासंबंधात दिलेल्या निर्णयावर कारणमीमांसा विचारणा केली आहे. अपीलकर्त्याची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मालमत्ता पत्रकांच्या नोंदीबाबतचा वाद योग्य त्या सक्षम न्यायासनापुढे मांडण्याचा मार्ग अपीलकर्त्यास अवलबंता येईल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २.७.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. संजय भगवान बनसोडे<br>कार्याध्यक्ष, भा.रि.पा. बहुजन महासंघ,<br>बारामती, पो. पिंपळी, ता. बारामती, जि. पुणे. | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, बारामती | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधिक्षक भूमी अभिलेख, पुणे | हजर |

अपीलकर्त्याने बारामती वॉर्ड क्र.१, सिटी सर्व्हे क्र. ४४७ च्या उता-यामध्ये झालेले फेरबदल कधी झाले, कसे झाले, याबाबत विचारणा केलेली दिसून येते. त्यावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील दाखल करावे अथवा कलम २५७ अन्वये दाद मागावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिले होते. त्यावर व्यथित होऊन अपीलकर्त्याने द्वितीय अपील केले आहे.

सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. अपीलकर्त्याने त्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यांतर्गत योग्य त्या सक्षम न्यायालयाकडे दाद मागणे उचित ठरेल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ९.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ... खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

१२.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३६ + २३७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुधीर माधव जोशी<br>फ्लॅट क्र.१५, इमारत क्र.२,<br>५८७, दत्तप्रसाद सोसायटी,<br>पुणे सिंहगड रस्ता, पुणे-३० | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी दि कराड अर्बन को.ऑप. बँक लि., कराड, जि. सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | दि कराड अर्बन को.ऑप. बँक लि., कराड | गैरहजर |

अपीलकर्त्याने दि कराड अर्बन को.ऑप. बँक यांचेकडे दोन स्वतंत्र अर्जांद्वारे अनुक्रमे एन.पी.ए. अकौंट व संगणक प्रशिक्षण व खरेदी संदर्भातील खर्चाचा तपशील मागितला होता.

माहितीचा अधिकार अधिनियम सदर बँकेस लागू होत नाही. असे मुख्य कार्यकारी अधिकारी, दि कराड अर्बन को.ऑप. बँक यांनी आयोगास सादर केलेल्या दि. १३.१२.२००७ च्या पत्रात नमूद केले आहे. नागरी सहकारी बँका माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येतात की नाही, याबाबत न्यायालयीन बाबींमुळे तूर्त 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचा आयोगाचा निर्णय असल्यामुळे बँकेचे म्हणणे मान्य करण्यात येत आहे

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३.७.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र बबन जाधव
रा.प्रथमेश को-ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.८४,
खो.क्र.३६, गोराई, (१) बोरिवली. — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण श्री.हिम्मत खराडे

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार, फलटण श्री.संभाजी हेरवाडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.१.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि.१४.४.१९७६ ला भूमीहीन दलितांना अतिरिक्त जमिनी कुळकायदा अंतर्गत देण्यात आल्या परंतु सदर अतिरिक्त ठरविलेल्या काही जमिनी परत मूळ मालकांना देण्यात आल्या. तरी वरील जमिनींचे हस्तांतरण कोणत्या कायद्यान्वये म्हणजेच वर उल्लेख केलेल्या दावा क्र.२/७६, ता.३१.८.१९७६ च्या निर्णयाने हस्तांतरण झाले. सदर हस्तांतरण प्रक्रियेच्या प्रतीची आवश्यकता आहे. | |

## विवेचन

कमाल जमीन धारणा कायद्या अंतर्गत दावा क्र.२/७६ मधील, दि.३१.८.१९७६ रोजी झालेल्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता श्री.रामचंद्र बबन जाधव जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण यांच्याकडे मागितली होती. सदर कागदपत्रे ब वर्गातील असल्यामुळे ३० वर्षांपर्यंत जतन केले जातात, आता ते कालबाह्य झालेले असल्यामुळे उपलबध होऊ शकत नाहीत, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले, तसेच त्याबरोबर फेरफाराचे उतारे पाठविले. त्याविरुध्द श्री.जाधव यांनी केलेले अपील अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, फलटण यांनी अमान्य केले. त्याविरुध्द श्री.जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.जाधव या दाव्याच्या संदर्भातील कागदपत्रांची व निर्णयाच्या प्रतीची मागणी विविध अर्जांद्वारे करीत आले आहेत. त्या त्या वेळी शोध घेऊन त्यांना उत्तर दिले आहे. तसेच पाहणीसाठी अभिलेखही उपलबध करुन देण्यात आले. ब वर्गातील कागदपत्रे जतन करण्याचा ३० वर्षांचा कालावधी संपल्यामुळे ही कागदपत्रे शोध घेऊनही उपलब्ध होत नसल्याचे त्यांना संपूर्ण अभिलेखासह पाहणीच्या आधारे स्पष्ट करण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, फलटण श्री.हिम्मत खराडे यंनी आयोगाला सादर कलेल्या निवेदनात नमूद केले. आपली त्याबाबत खात्री पटली असून अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे याच संदर्भात दाखल असलेल्या नऊ अपिलांसह हे अपील निकाली ठेवावे, असे श्री.जाधव यांनी दि.१९.१२.२००७ रोजी लेखी दिले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२३.७.२००८
२१.१.२००८सातारा/३-५

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५१ / सांगली | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | डॉ. विकास आप्पाराया आडमुठे<br>रा. दुधगाव, ता. मिरज, जि. सांगली | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर | हजर |

अपीलकर्ता डॉ. विकास आप्पाराया आडमुठे यांनी श्री अंबिका माता महिला नागरी पतसंस्था मर्या., पेठ वडगाव या संस्थेच्या सहकारी कायदा कलम ८८ अन्वये करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल व त्यावरील आदेश याची प्रमाणित प्रत व संस्थेच्या चार संचालिकांच्या कार्यकालाची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांच्याकडे दि. ३१.७.२००६ च्या अर्जान्वये मागितली होती. दि. २०.९.२००६ रोजी त्यांना काही माहिती निःशुल्क देण्यात आली. ती अपुरी व चुकीची असल्याच्या कारणावरून डॉ. आडमुठे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. माहिती व्यक्तिशः नेणार असल्याचे डॉ. आडमुठे यांनी नमूद केले होते. दि. २४.८.२००६ रोजी त्याबाबत कळवूनही त्यांनी माहिती नेली नाही. दि. २०.९.२००६ रोजी त्यांनी ती घेतली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांचे म्हणणे अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले व ऊर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून त्वरित प्राप्त करून

घेऊन अपीलकर्त्यास देण्याचे आदेश त्यांनी दिले. ऊर्वरित माहिती संस्था स्तरावरील होती व ती अपीलकर्त्यास नंतर देण्यात आली, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी लेखी नमूद केले. मात्र आपल्याला ही माहिती मिळाली नव्हती, ती आज दि. १४.५.२००८ रोजी प्राप्त झाली, असे डॉ. आडमुठे यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पाहता मूळ अर्जाला उत्तर देण्यास विलंब झालेला नाही. संस्था स्तरावरील माहिती नेमकी केव्हा दिली हे जन माहिती अधिकाऱ्यांनी स्पष्टपणे नमूद केलेले नाही. मात्र मूळ अर्ज दि. २२.६.२००६ चा असून दि. १४.५.२००८ रोजी माहिती पूर्ण झाली आहे. ही दिरंगाई अक्षम्य असून त्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. माहिती अपूरी व विलंबाने देणे याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती निलीमा गायकवाड यांना रु. ५०००/- ची शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती वसूल करून '००७०, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी दि. १०.८.२००८ पर्यंत करून त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल दि. २०.८.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. १९.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| १ | अपील क्रमांक | २५२ / सांगली | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २ | अपीलकर्ता | डॉ. विकास आप्पाराया आडमुठे<br>रा. दुधगाव, ता. मिरज, जि. सांगली | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर | हजर |

अपीलकर्ता डॉ. विकास आप्पाराया आडमुठे यांनी श्री अंबिका माता महिला नागरी पतसंस्था मर्या., पेठ वडगाव या संस्थेच्या उपविधी व त्या संदर्भातील धारिका पाहणी करण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांच्याकडे तारीख व वेळ मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत त्यांना तारीख व वेळ कळविली. त्यानुसार पाहणी केल्यानंतर डॉ. आठपुठे यांनी कागदपत्रांच्या छायांकित प्रतींची मागणी केली. डॉ. आठपुठे यांनी योग्य ते नक्कल शुल्क भरल्यानंतर प्रती दिल्या जातील, असे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांनी त्यांना कळविले. मात्र संबंधित शुल्क त्यांनी भरल्याचे दिसत नाही. आपल्याला उत्तर पाठविण्यास व माहिती देण्यास विलंब झाला, असे डॉ. आठपुठे यांचे म्हणणे आहे. कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकाऱ्यांनी मुदतीत सर्व कार्यवाही पूर्ण केली असल्याचे दिसते. ऊर्वरित माहिती आठ दिवसांत देण्यात येईल, असे विद्यमान

जन माहिती अधिकारी श्री. बी.आर. डोंगळे व अपिलीय प्राधिकारी श्रीमती नीलिमा गायकवाड यांनी लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास उर्वरित माहिती तात्काळ नि:शुल्क देण्यात यावी व जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या स्वीकृतीच्या पोहोचेसह अहवाल आयोगाला सादर करावा.

पुणे
दि.१८.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**